# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आयुक्त यांचे कार्यालय

मुख्यालय, 2रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/आयुक्त/ 81 /2023-24 दि. 16/01/2024

**परिपत्रक**

**विषय:-** महापालिका विभाग अंतर्गत पत्रव्यवहारा बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेत अंतर्गत पत्रव्यवहारासाठी सध्यस्थितीत ई-ऑफीस प्रणाली सुरु करण्यात आलेली आहे. त्यामुळे महापालिका विभागांतर्गत होणारा पत्रव्यवहार हा ई-ऑफीस प्रणालीद्वारे होणे बंधनकारक असून तो ई-ऑफीसद्वारेच करावा.

तसेच महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामासंदर्भात विभागांतर्गत होणाऱ्या पत्रव्यवहारा दरम्यान निम्नस्तरीय अधिकाऱ्यामार्फत त्या विभागाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांना डावलून परस्पर स्वत:च्या स्वाक्षरीने दुसऱ्या विभागाच्या विभागप्रमुखाकडे पत्रव्यवहार होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. जे कार्यालयीन शिस्तीस अनुसरुन नाही.

सबब, प्रशासकीय कामकाजातील सुसूत्रता व शिस्तीच्या दृष्टीने महापालिका विभागांतर्गत होणारा पत्रव्यवहार ई-ऑफीसद्वारे त्या संबंधित विभागाचे अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, मुख्यलेखापरीक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सहा. संचालक (नगररचना), शहर अभियंता, नगरसचिव तसेच सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांच्या स्वाक्षरीनेच पाठविण्यात यावा.

**(संजय श्रीपतराव काटकर,** भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**

1. विभागप्रमुख / खातेप्रमुख (सर्व)
2. सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी (सर्व)
3. स्थळप्रत.